# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे-४११००१

फोन नं. (०२०)२६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com


जा.क्र रासनिप्रा/अभिलेख/कक्ष-१४/नामनिर्देशनपत्र छाननी मा. सूचना/ २०१८ दिनांक - ११/०६/२०१८

/६२१३/

## " मार्गदर्शक सूचना "

**विषय :- नामनिर्देशन पत्र छाननी बाबत मार्गदर्शक सूचना .......**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब प्रमाणे, संपूर्ण राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका पारदर्शक आणि निष्पक्षपातीपणे पार पाडण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून, त्यानुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे दि. ३०.०३.२०१३ रोजीच्या अधिसूचने नुसार गठण करण्यात आलेले आहे, तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक ) नियम २०१४ मधील तरतूदीनुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका ह्या पारदर्शक, भयमुक्त, निपक्षपाती व मोकळ्या वातावरणात अधिनियम, नियम व उपविधीच्या चौकटीत अचूकरित्या होणे अपेक्षित आहे. सदर निवडणूक नियमामधील नियम २० नुसार निवडणूक प्रक्रियेतील महत्वाचा असलेला नामनिर्देशन दाखल करण्याचा टप्पा सुरु करण्यात येतो व अशा प्रकारे दाखल झालेल्या नामनिर्देशन अर्जाची छाननी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम, २५ नुसार करण्यात येते. आजतागायत झालेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूकांचा अनुभव लक्षात घेता नामनिर्देशन पत्रांची छाननी अचूक होण्याचे दृष्टीने अधिनियमातील व नियमातील नामनिर्देशन पत्राच्या छाननी बाबतच्या तरतूदी सहज व सुलभरित्या निवडणूक निर्णय अधिका-याना उपलब्ध होण्याच्या उद्देशाने प्राधिकरणामार्फत खालीलप्रमाणे मार्गदर्शनपर सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**अ) नामनिर्देशन पत्रांच्या छाननीबाबतचे महत्व -**

१) नामनिर्देशन पत्राची छाननी करण्याचे कामकाज महत्त्वाचे असल्यामुळे सदरचे कामकाज निवडणूक निर्णय अधिका-यात निहीत होत असल्याने ते त्यांनी स्वत: करणे बंधनकारक आहे. छाननीचे कामकाज सर्वसाधारण परिस्थितीमध्ये सहाय्यक निवडणूक निर्णय अधिका-याला किंवा इतरांना करता येणार नाही. तथापि, नियंत्रणाबाहेरील कारणामुळे निवडणूक निर्णय अधिका-याला छाननीचे कामकाज करणे अशक्य झाल्यास एका सहाय्यक निवडणूक निर्णय अधिका-याला छाननीच्या कामकाजाचे अधिकार प्रदान करता येतील. परंतु सदर अधिकाराचे प्रदान अत्यंत अपवादात्मक परिस्थितीतच करता येईल. मात्र निवडणूक निर्णय अधिका-याने सदर बाब तात्काळ जिल्हा निवडणूक अधिका-याच्या व प्राधिकरणाच्या निदर्शनास आणणे बंधनकारक असेल.

२) नामनिर्देशन पत्राची छाननी करण्याचे कामकाज अर्धन्यायिक स्वरूपाचे (Quasi-Judicial nature) असल्यामुळे सदरचे कामकाज पार पाडताना नैसर्गिक न्यायाच्या तत्वांचे पालन करण्याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

३) सदर कर्तव्य पार पाडताना वैयक्तिक अथवा बाह्य प्रभावाखाली येऊन छाननीमध्ये अवलंबण्यात येणा-या कार्यपध्दतीमध्ये बदल करता येणार नाही.

४) सर्व उमेदवारांना समान वागणूक देणे कायद्याला अभिप्रेत असून निपक्षपती, स्वच्छ व भेदभावरहीत वर्तनाची अपेक्षा निवडणूक निर्णय अधिका-याकडून आहे.

५) उमेदवाराने किंवा त्यांचे प्रतिनिधीने जरी वाद विवाद केला किंवा असहकार्य केले तरीही निवडणूक निर्णय अधिका-याने भावनेच्या भरात निर्णय न घेता, नम्रतापूर्वक, संयमाने परिस्थिती

हाताळली पाहिजे, परंतु कायद्यातील, निवडणूक नियमातील व उपविधितील तरतूदी ह्यांच्यानुसार घेतलेल्या निर्णयावर ठाम राहणे आवश्यक आहे.

६) आपण ठरवून दिलेल्या ठिकाणी, दिलेल्या तारखेवर व दिलेल्या वेळेला छाननीचे काम करणे आवश्यक आहे.

**ब) नामनिर्देशन छाननी प्रत्यक्षात सुरु होण्यापूर्वी निवडणूक निर्णय अधिका-याने करावयाचा प्राथमिक अभ्यास व घ्यावयाची दक्षता –**

१) आवश्यकतेनुसार निवडणूक लढविणाऱ्या सभासदांची माहिती संबंधीत संस्थेकडून उपलब्ध करून घ्यावी.

२) प्राप्त झालेल्या आक्षेपाची पडताळणी करावी.

३) संचालक पदाच्या पात्रते/अपात्रतेबाबत असणाऱ्या सहकार कायदयातील, नियमातील, निवडणूक नियमातील, उपविधीतील तरतुदींचे परिनिरीक्षण व अभ्यास करावा.

४) नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत प्राप्त नामनिर्देशन पत्रांची प्राथमिक तपासणी निवडणूक निर्णय अधिका-यांनी त्यांचे स्तरावरून करून ठेवावी.

**क) i) छाननीची प्रत्यक्ष, वास्तविक (Physical) कार्यपध्दती –**

१) एखाद्या उमेदवाराने एकाच जागेसाठी एका पेक्षा जास्त नामनिर्देशन पत्र भरले असतील तर ते सर्व एकत्रित करून प्रत्येक नामनिर्देशन पत्राची छाननी करणे आवश्यक आहे.

२) निवडणूक निर्णय अधिका-यांकडे किंवा सहाय्यक निवडणूक अधिका-यांकडे सादर केलेल्या व नोंदवहीत नोंदलेल्या सर्व नामनिर्देशन पत्रांची छाननी करणे अपेक्षित आहे.

३) छाननीच्या संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडीओ चित्रीकरण केल्यामुळे छाननीमध्ये पारदर्शकता येईल त्यामुळे आवश्यक असेल तेथे व्हिडीओ चित्रीकरण करण्याबाबत विचार करता येईल.

४) नामनिर्देशन पत्रावर एकही आक्षेप घेण्यात आला नाही तरी निवडणूक निर्णय अधिका-याने स्वत: खात्री केली पाहिजे की, सादर झालेली नामनिर्देशन पत्रे कायद्याच्या व निवडणूक नियम व उपविधीच्या दृष्टीने पात्र आहेत किंवा कसे.

५) उमेदवार, त्यांचा प्रतिनिधी, एक सूचक तसेच अधिकार पत्र दिलेला इतर व्यक्ती (त्यामध्ये वकिलाचा समावेश असू शकतो) छाननीच्यावेळी उपस्थित राहू शकतील, या व्यक्तीशिवाय इतरांना प्रवेश देणे अपेक्षित नाही.

**ii) नामनिर्देशन पत्र फेटाळण्याबाबत / रद्द करणेबाबत अधिनियम व नियमातील तरतुदी –**

१) नामनिर्देशन पत्रासोबत उमेदवाराने आवश्यक ते शपथपत्र सादर न केल्यास,

२) उमेदवाराने किंवा आवश्यक तेवढ्या सूचकांनी नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी न केल्यास,

३) तसेच अनुमोदक व सूचकाचे नाव मतदार यादीत नसल्यास,

४) नामनिर्देशन पत्रासोबत आवश्यक त्या रकमेची अनामत रक्कम / ठेव जमा न केल्यास,

५) त्या त्या प्रवर्गासाठी राखीव असणा-या जागेकरीता अपात्र असलेल्या व्यक्तीने नामनिर्देशन पत्र भरणा केल्यास,

६) मतदार यादीमध्ये नाव नसेल तर,

७) शपथपत्र अपूर्ण असेल किंवा सर्व रकाने भरलेले नसतील तर,

8) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 73 सी बी मधील तरतूदीनुसार उमेदवार अपात्र असल्यास,

9) महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम 2014 चे नियम 25(2) मधील तरतूदी नामनिर्देशन पत्रास लागू होत असतील तर,

**iii) कोणत्या कारणास्तव नामनिर्देशन पत्र फेटाळता येत नाही** –

१) छाननीच्यावेळी उमेदवार किंवा त्यांचा प्रतिनिधी हजर असणे बंधनकारक नाही. छाननीवेळी उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी हजर नाही या एका कारणावरून.

२) योग्य कारणांशिवाय नामनिर्देशन पत्र नामंजूर केले व संबंधित उमेदवारास निवडणूक लढविण्यास प्रतिबंध केला तर अशा अयोग्य कृतीमुळे निवडणूक निकाल प्रभावित होतो व त्यामुळे अशी निवडणूक रद्यबातल होणेलायक आहे असे कायद्याने गृहीत धरले जाते.

३) छोट्या छोट्या तांत्रिक व लेखनातील चुका बाबत तुलनात्कदृष्ट्या व्यापक दृष्टीकोन ठेवणे केव्हाही चांगले, त्यामुळे या कारणांवरून नामनिर्देशन पत्र नामंजूर करण्याची घाई नियमास धरून होणार नाही.

४) नामनिर्देशन पत्रामध्ये निशाणीचा तपशिल नमूद केला नाही म्हणून नामनिर्देशन पत्र नामंजूर करणे नियमास धरून होणार नाही.

५) नामनिर्देशन पत्रावरील स्वाक्षरी निळ्या शाईने केलेली नाही म्हणून नामनिर्देशन पत्र नामंजूर करणे चुकीचे ठरेल, कोणत्याही शाईने स्वाक्षरी केली तरी चालू शकते.

६) निवडणूक वर्ष चुकीचे नमूद केल्यामुळे, निशाणीची निवड न केल्यामुळे, मतदार संघाचे नेमके व अचूक नाव नमूद न केल्यामुळे, (उदा – S.C./S.T. साठी राखीव मतदार संघाबाबत फक्त S.C किंवा S.T चा उल्लेख केला) नामनिर्देशन पत्र नामंजूर करणे अयोग्य ठरेल.

७) मतदार यादीतील अनुक्रमांकामध्ये काही त्रुटी असल्यामुळे, वय, नाव किंवा इतर तपशिल नमूद करण्यामध्ये काही त्रुटी असल्यामुळे, इत्यादी किरकोळ तांत्रिक कारणामुळे नामनिर्देशन पत्र नामंजूर करणे अपेक्षित नाही.

**iv) संक्षिप्त चौकशी (Summary Inquiry) पध्दती** -

१) दिर्घ व वेळखाऊ औपचारीक पध्दतीचा अवलंब न करता विनाविलंब निर्णयाप्रत येण्यासाठी वापरलेली पध्दती म्हणजे संक्षिप्त चौकशी (summary inquiry) होय.

२) आक्षेप आल्यास संक्षिप्त चौकशी ( summary inquiry) करून त्यावर निर्णय घेणे अपेक्षित आहे.

३) आक्षेप घेण्यात आलेल्या नामनिर्देशन पत्राबाबत त्या उमेदवाराने छाननीच्यावेळी वेळ मागणी केल्यास त्या नामनिर्देशन पत्रावरील छाननी तहकूब करून उशिरात उशिरा दुस-या दिवशी वैध उमेदवाराची यादी डकविणेपूर्वी, निर्णय घेणे अपेक्षित आहे. तथापि उर्वरीत इतर नामनिर्देशन पत्राची छाननी त्याच दिवशी म्हणजे छाननीच्या दिवशी पूर्ण करणे अपेक्षित आहे.

**v) उपस्थित हरकतीवर निर्णय घेणे** –

१) एखाद्या नामनिर्देशन पत्रावर आक्षेप / हरकत घेतली असल्यास व सदर हरकतीवर उत्तर देण्यासाठी उमेदवार हजर नसल्यास निवडणूक निर्णय अधिका-याने आक्षेपामध्ये तथ्य आढळल्यास न्यायोचित कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

२) आक्षेप घेतला असताना आक्षेप फेटाळून लावून निवडणूक निर्णय अधिका-याने नामनिर्देशन पत्र मंजूर केल्यास आक्षेप घेणा-यास मागणी केल्यानंतर निर्णयाची प्रमाणित प्रत देण्यात यावी.

**vi) कोणत्या परिस्थितीत निर्णय अल्पकाळासाठी स्थगित करता येईल** –

एखादी माहिती उपलब्ध होणार असेल तर माहिती उपलब्ध होईपर्यंत एखाद्या नामनिर्देशन पत्राचे छाननी कामकाज थांबवण्यास हरकत नाही. तथापि, वैध उमेदवाराची यादी डकविण्यापुर्वी नामनिर्देशन पत्रावरील आक्षेपाबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

vii) **निर्णय देण्याची पध्दती — लेखी, कारणांसह इत्यादी**

१) काय आक्षेप होता व नामनिर्देशन पत्र का नामंजूर करण्यात येत आहे इत्यादी बाबत स्वयंस्पष्ट कारणे नमूद करून निर्णय घेणे आवश्यक आहे.

२) निवडणूक निर्णय अधिका-याने घेतलेला निर्णय भविष्यामध्ये न्यायालयामध्ये आव्हानित केला जावू शकतो. त्यामुळे कारणे नमूद करण्याला अनन्य साधारण महत्त्व आहे.

३) नामनिर्देशन पत्र नामंजूर करताना कारणे नोंदवावीत व आदेशाच्या प्रमाणित प्रती तात्काळ संबंधीत उमेदवारांना देण्यात याव्यात. त्यासाठी कोणतेही शुल्क आकारू नये त्यासाठी अर्ज सादर करण्याची देखील आवश्यकता नाही.

४) छाननीचे कामकाज पूर्ण केल्यानंतर वैध उमेदवाराची यादी तयार करावी. एका उमेदवाराने एकाच जागेसाठी एका पेक्षा जास्त नामनिर्देशन पत्र भरले असतील व एका पेक्षा जास्त नामनिर्देशन पत्र वैध ठरले असतील तरी सुध्दा त्या उमेदवाराचे एकच नाव यादीमध्ये घ्यावे. अपात्र व नामंजूर केलेल्या उमेदवाराची नावे यादीमध्ये घेवू नयेत.

**ड) छाननी संदर्भात मा उच्च न्यायालयाचे महत्वाचे न्यायनिर्णय —**

**1. WRIT PETITION NO 4233 of 2015**

Coram – Sunil P Deshmukh, J.
Date – 23rd April, 2015

**Scrutiny**

**Para 4** - .............. that relevant date is the last date for filing nomination and no corrective action thereafter is permissible and since in this case corrective action is sought to be taken by candidate himself on the date of scrutiny ...................

**Para 6** – Learned Assistant Government Pleader submits that, according to directives issued by election commission from time to time and further that enquiry at the stage of nomination being of summary nature, no fault can be found with the impugned order for election officer has gone by the documents and averments on record. He submits that the petitioner did not object to the provisional voters list which included name of respondent no. 4 nor has he filed any proceedings against finalization of voters list. In such a case, election officer has passed the impugned order correctly.

**Para 7** – Taking into account that respondent no 4's name appeared in the provisional as well as final voters list which went un-objected before the concerned authority and that along with nomination, requisite documents showing eligibility have been filed by respondent no.4 veracity of which though is sought to be ...............

**2. WRIT PETITION NO 4371 of 2015**

Coram – Sunil P Deshmukh, J
Date – 24th April, 2015

**Scrutiny**

**Para.2** – Central thrust of the objection, being raised by Mr. Dhorde learned senior advocate is that the audit report of respondent no.6 society on which reliance is sought to be placed by respondent no 7 is of "C" category for the year 2009-2013 and as such respondent.

**Para. 5** – In the face of situation as above and considering the scope of the enquiry required at the stage of scrutiny of nomination, the election officer appears to have taken into account that the documents which have been annexed with nomination paper depict that respondent no 6 society's audit report is of "B" category. In such circumstances further probe at this stage w s not expected by the election officer.

### 3. WRIT PETITION NO 4510 of 2015

Coram – Sunil P Deshmukh, J
Date – $27^{th}$ April, 2015

**Scrutiny**

**Para 4** – In view of aforesaid position, the petition involves disputed questions of fact. The election officer has gone by documents, as they appeared at the stage of scrutiny. A deeper probe at that stage is not expected from the election officer .................

### 4. WRIT PETITION NO 1778 of 2015

Coram – Anoop V Mohta, J.
Date – 20 February, 2015

**Scrutiny**

**Para 3** – The Petitioner's nomination was rejected, though supported by all the relevant documents, as required for filing the nomination to contest the election, being belonging to other backward category", as required under Section 73 B of the Maharashtra Co- operative Societies Act, 1960 (for short, "the MCS Act") and the Rules in the Maharashtra Co-operative Societies (Election to committee) Rules, 2014(for short "the MCS Rules, 2014"). Respondent no 1 – the District Co-operative Election Officer, rejected the Nomination Form, without giving opportunity and / or to correct the bonafide mistake of not signing the certification / affidavit clause (c) of the Nomination Form.

**Para 4** – In my view, the provisions of Section 73B of the MCS Act and Rule 21(3) and Rule 25 (2) (c)and specifically 25(4) and proviso to clause 5 the MCS Rules, 2014, have been totally overlooked. This is not read to mean that, the Returning Officer is not under obligation to see the full compliances, as per the mandate of the provision. For the defect of this nature, instead of giving opportunity to correct the same, should not have denied and / or rejected the Nomination Form, as done in the present case. The provisions itself provide that the returning officer shall not reject any Nomination papers on any defect, which is not any substantial character (Rule 25(4)) . The missing signature, only in clause (c ) of the Nomination Form, in my view, is not defect of substantial character. There is no objection raised by anybody else, in this regard. The decision of the Returning Officer, to reject the said Nomination form of the petitioner, in my view, is liable to be quashed and set side.

**Para 5** – Division bench of the Court in Anant Janardan Patil Vs State of Maharashtra and Ors though with the provisions of Bombay Village Panchayats Act 1958 but in similarly situated position, where the Nomination Form was rejected on technical ground, not annexing the caste certificate, and held that the defect was no substantial character, therefore, set aside the order of rejection of nomination paper. In the present case, as recorded above, there is one missing signature at clause no (c ) of the Nomination Form, when the other substantial documents on the part of the record, justified the caste claim, therefore order dated 11.02.2015 is required to be quashed and set aside.

### 5. WRIT PETITION NO 1778 of 2015

Coram – Anoop V Mohta, J.
Date – 20 February, 2015

**Para 8** – " Reasons now are considered third pollar of rules of natural justice"

६. एखादा सभासद हा कोणत्याही सहकारी संस्थेचा थकबाकीदार (defaulter) असेल तर त्याला कोणत्याही सहकारी संस्थेच्या संचालक पदाची निवडणूक लढविता येत नाही. सदर बाब मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र. ३४४६/२०१५ (Coram – Z. A. Haq) मध्ये स्पष्ट केलेली आहे.

**मा. आयुक्त राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्या मान्यतेने**

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य पुणे

**प्रति –**

१. सर्व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
२. सर्व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी

जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना कळविण्यात येते की, सदर मार्गदर्शक सूचना निवडणूक निर्णय अधिकारी यांचे निदर्शनास आणाव्यात.

३. सर्व कक्ष प्रमुख